# खामगांव येथे सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन संपन्न...



खामगांव : स्थानिक गो. से कनिष्ठ महाविद्यालय येथे सायबर सुरक्षा बाबत मार्गदर्शन संपन्न झालं. यामध्ये सायबर क्राईम आणि त्याचे प्रकार, सोशल मिडीयाच्या माध्यमातून ऑनलाईन गुन्हे कसे घडतात , इंटरनेट आणि मोबाईलच्या माध्यमातून होणारे फ्रॉड्स, तसेच अशी ऑनलाईन फसवणुक होवु नये म्हणुन कोणती काळजी घ्यावी याविषयी महत्त्वपूर्ण आणि सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यामध्ये विदयार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन मोबाइलच्या योग्य आणि कमीत कमी वापर करण्यासाठी शपथ देण्यात आली.

ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांच्या सहकार्याने व 'क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने प्राचार्य डॉ. जे. एम. साबू सर आणि उपक्रमाचे समन्वयक डॉ. एच. जे. खरात सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केली होती. यामध्ये सायबर वॉरियर्स प्रतिक्षा हिवराळे व प्रियांका जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर सर शिक्षक वृंद वाघ सर,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अकोला दर्शन

21-10-2023

वि... न्यायालयात

ए... २०२३

चौ... /२०२३

अ... बुधनेर ३)

कि... बाई पांडुरंग थोरात) ५) कमल भिमराव बुधनेर (कमल प्रल्हाद जानकर) सर्व रा. दगडपारवा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

विरूद्ध

गैरअर्जदार : निल

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत -भिमराव मारोती बुधनेर यांचा मृत्यु दि. १३/०५/१९९७ रोजी व मयत सुभद्राबाई भिमराव बुधनेर यांचा मृत्यु दि. १७/११/२०१६ रोजी दगडपारवा ता. बार्शिटाकळी, जि. अकोला येथे झाला.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, मयतांचे वरील अर्जदाराव्यतिरीक्त कोणीही वारसदार नाही. अशा आशयाचा वारस कायदा कलम २, मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र अर्ज दाखल केला असून.

त्याअर्थी त्या अर्जाची सुनावणी दि. २६/१०/२०२३ विद्मान सह. दिवाणी न्यायालय बार्शिटाकळी येथे होणार असून त्या बाबत कोणालाही, कुठलाही अक्षेप असेल तर, त्यांनी विद्मान दिवाणी न्यायालय बार्शिटाकळी, येथे दि. २६/१०/२०२३ रोजी ठिक ११ वा. कागदपत्रासह स्वत: जातीने अथवा निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत हजर रहावे अन्यथा अर्जदाराचे अर्जावर एकतर्फी सुनावणी करण्यात येईल. करीत, अज दि. ११/१०/२०२३ माझी सही व कोर्टानिशी दिले.

बार्शिटाकळी दि.११/१०/२०२३

(सही)

सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, बार्शिटाकळी

## नोटीस

...तर), अकोला यांचे न्यायालयात

प्रोसेस न २००७५/२०२३

दि. १७/१०/२०२३